MERC
Date 16/03/05
No. 1224

# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक:- [illegible].२००५

विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक.विनिआ-२००४/सीआर-११०/ऊर्जा-३.-विद्युत अधनियम, २००३ (२००३ चा ३६) याच्या कलम १८० चे पोटकलम (१), व पोटकलम (२) चा खंड (ज) आणि कलम १०६ यांव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास सहाय्य करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याव्दारे, पुढील नियम करीत आहे:-

१. संक्षिप्त नाव .-या नियमांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अर्थसंकल्प तयार करणे व सादर करणे) नियम, २००४ असे म्हणावे.

२. व्याख्या .- या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(अ) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग असा आहे ;

(ब) "नमुना " याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेले नमुने, असा आहे ;

(क) "शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ , महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ड) "वित्तीय वर्ष " याचा अर्थ, १ एप्रिल रोजी सुरु होणारे व पुढील वर्षाच्या ३१ मार्च रोजी संपणारे वर्ष, असा आहे.

३. वार्षिक अर्थसंकल्प तयार करुन तो सादर करणे.-

(१) आयोग, -

(अ) आगामी वित्तीय वर्षातील आपला अंदाजित जमा, नमुना " अ" मध्ये तयार करील ;

(ब) आगामी वित्तीय वर्षाचा आपला अंदाजित खर्च, नमुना "ब" मध्ये तयार करील ;

(क) आगामी वित्तीय वर्षातील अनुदानांसाठी त्याने राज्य शासनाला केलेल्या विनंतीसंबंधातील अंदाज, नमुना " क" मध्ये तयार करील .

(२) अशारीतीने तयार केलेले अंदाज म्हणजेच अर्थसंकल्प, मागील वित्तीय वर्षाच्या १ नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी किंवा आगामी वित्तीय वर्षाच्या अनुदानांची तरतूद करण्यासाठी शासन विनिर्दिष्ट करील अशा वाढीव मुदतीत शासनाला सादर करण्यात येईल.

४. सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन ते सादर करणे.
(१) नियम ३ अन्वये तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज चालू वर्षात अपर्याप्त किंवा अपुरे असल्याचे आढळून आले असेल किंवा कोणत्याही कारणास्तव त्यांचे पुनरीक्षण करण्याची गरज असेल त्याबाबतीत, आयोगास, अतिरिक्त अनुदानांची कोणतीही आवश्यकता भासल्यास, त्या चालू वर्षाच्या पहिल्या ४ महिन्यांत किंवा ८ महिन्यांत किंवा, यथास्थिती, ९ महिन्यांत केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे, त्याबाबतच्या योग्य त्या समर्थनासह, सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज नमुना "ड" मध्ये तयार करता येतील.
(२) अशारीतीने तयार केलेले सुधारित अंदाज, शासन विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी शासनाला सादर करण्यात येतील.

५. संकीर्ण .- या नियमांच्या निर्वचनासंबंधी कोणतीही शंका असल्यास, किंवा एखादया विशिष्ट बाबीविषयी नियमात स्पष्ट तरतूद करण्यात आली नसेल तेव्हा, ती बाब शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि त्याबाबतचा शासनाचा निर्णय अंतिम असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( भू. प्र. पाण्डेय )
शासनाचे प्रधान सचिव

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र शासन राजपत्र-१ (ल) असाधारण राज्यपत्रामध्ये आज दिनांक 17.3.२००५ रोजी प्रसिध्द करून त्याच्या १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

(र. ना. अंबरित )
शासनाचे उप सचिव

प्रत:-
सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ ( ५ प्रती )
सचिव, ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
अध्यक्ष, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, सेवा भवन, आर. के. पुरम, नवी दिल्ली.
सचिव, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, तिसरा मजला, आय. सी. डब्ल्यू. ए. आय. भवन, ३, इन्स्टिटयूशनल एरिया, लोधा रोड, नवी दिल्ली-११० ००३.

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई. (पत्राने)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्राल, मुंबई-३२.
प्रधान सचिव (साप्रवि), मंत्राल, मुंबई-३२.
प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्राल, मुंबई-३२.
सचिव (उद्योग), उ.ऊ.व का.वि., मंत्राल, मुंबई-३२.
प्रधान सचिव (नियोजन), मंत्राल, मुंबई-३२.
प्रधान सचिव (वि. व न्या.) मंत्राल, मुंबई-३२.
प्रधान सचिव (कामगार), उ.ऊ.व का.वि., मंत्राल, मुंबई-३२.
विकास आयुक्त (उद्योग), नवीन प्रशासन भवन, मंत्राल, मुंबई-३२.
संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्राल, मुंबई-३२.
मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.वि., प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई-७१.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
व्यवस्थापकीय संचालक, टाटा विद्युत कंपनी, बॉम्बे हाऊस, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स एनर्जी लि., इलेक्ट्रिसिटी हाऊस, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-५५.
मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई-५.
कार्यकारी संचालक, मुळा प्रवरा इलेक्ट्रिक को.ऑप. सोसा. लि., श्रीरामपूर, जिल्हा-अहमदनगर,
अध्यक्ष, उद्योग मित्र, निर्मल, नरीमन पॉईंट, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अवर सचिव, कार्यासन-(ऊर्जा-५)
कक्ष अधिकारी, कार्यासन ऊर्जा-१/ ऊर्जा-४/ ऊर्जा-६/ ऊर्जा-७/
निवड नस्ती (ऊर्जा-३), उ.ऊ.व का.वि.

नमुना "अ"

(नियम ३ (१) (अ) पहा)
(अनुदानाची तरतूद करण्यासाठी शासनाला सादर करावयाचा)

आयोगाच्या एकूण जमा रकमांचे अर्थसंकल्पीय अंदाज

वित्तीय वर्ष ----------

(रक्कम रुपये हजारामध्ये)

| निधीचे साधन (१) | आयोगाला गेल्या दोन वर्षांमध्ये मिळालेला प्रत्यक्ष निधी रुपये (२) | पुढील वित्तीय वर्षामधील अंदाजित जमा रकमा रुपये (३) | समर्थन (४) |
|---|---|---|---|
| राज्य शासनाकडील अनुदाने<br>फी व आकार यातून जमा झालेल्या रकमा<br><br>इतर सर्व साधनामार्फत निधी पुरविणाऱ्या अभिकरणांकडून जमा झालेल्या रकमा | | | |
| एकूण जमा | रुपये | रुपये | |

नमुना " ब "

(नियम ३ (१) (ब) पहा)

(अनुदानांची तरतूद करण्यासाठी शासनाला सदर करावयाचा)

## आयोगाच्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज

वित्तीय वर्ष ----

( रक्कम रुपये हजारात)

| खर्चाचे शीर्ष (१) | आयोगाने गेल्या दोन वर्षांमध्ये केलेला प्रत्यक्ष एकूण खर्च रुपये (२) | पुढील वित्तीय वर्षामधील अंदाजित खर्च रुपये (३) | समर्थन (४) |
|---|---|---|---|
| भांडवली खर्च<br>वेतन व मजुरी<br>प्रवास<br>कार्यालयीन खर्च<br>व्यावसायिक फी<br>भाडे, दर व कर<br>प्रकाशने<br>जाहिरात व प्रसिध्दी<br>करमणूक<br>व्याज/ बँक आकार<br>निवृत्तिवेतन /उपदान<br>संगणक खर्च<br>दुरुस्ती व परिरक्षण<br>पेट्रोल, तेल<br>व वंगण<br>इतर खर्च<br>घसारा | | | |
| एकूण | रुपये | रुपये | |

नमुना "क"

(नियम ३ (१) (क) पहा)
( अनुदानांची तरतूद करण्यासाठी शासनाला सादर करावयाचा )

आयोगासाठी अनुदानांची तरतूद करण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाज.

वित्तीय वर्ष ----

(रक्कम रुपये हजारात)

| खर्चाचे शीर्ष (१) | शासनाने मागील दोन वर्षांमध्ये केलेली तरतूद रुपये (२) | आयोगाने केलेला प्रत्यक्ष खर्च रुपये (३) | आयोगाने पुढील वित्तीय वर्षाकरिता प्रस्तावित केलेली अंदाजित शासकीय अर्थसंकल्पीय अनुदाने /तरतूद रुपये (४) | समर्थन (५) |
|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च<br>वेतन व मजूरी<br>प्रवास<br>कार्यालयीन खर्च<br>व्यावसायिक फी<br>भाडे, दर व कर<br>प्रकाशने<br>जाहिरात व प्रसिध्दी<br>करमणूक<br>व्याज/बँक आकार<br>निवृत्तीवेतन /उपदान<br>संगणक खर्च<br>दुरुस्ती व परिरक्षण<br>पेट्रोल, तेल व वंगण<br>इतर खर्च<br>घसारा | | | | |
| एकूण | रुपये | रुपये | रुपये | |

3311005CS+

नमुना 'ड'
(नियम ४ (१) पहा)
(अनुदानांची तरतूद करण्यासाठी शासनाला सादर करावयाचा)

आयोगासाठी अनुदानांची तरतूद करण्यासाठी सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज.

वित्तीय वर्ष -----

( रक्कम रुपये हजारात)

| खर्चाचे शीर्ष (१) | आयोगाने चालू वित्तीय वर्षासाठी प्रस्तावित केलेले अर्थसंकल्पीय अंदाज रुपये (२) | वित्तीय वर्षामधील अनुदानांची प्रत्यक्ष शासकीय तरतूद रुपये (३) | आयोगाने चालू वित्तीय वर्षाच्या ४,८ महिन्यांच्या कालावधीत केलेला प्रत्यक्ष खर्च. रुपये (४) | चालू वित्तीय वर्षासाठी शासनाकडून आवश्यक असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीचे सुधारित अंदाज रुपये (५) | समर्थन (६) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च | | | | | |
| वेतन व मजुरी | | | | | |
| प्रवास | | | | | |
| कार्यालयीन खर्च | | | | | |
| व्यावसायिक फी | | | | | |
| भाडे, दर व कर | | | | | |
| प्रकाशने | | | | | |
| जाहिरात व प्रसिध्दी | | | | | |
| करमणूक | | | | | |
| व्याज /बँक आकार | | | | | |
| निवृत्तीवेतन / उपदान | | | | | |
| संगणक खर्च | | | | | |
| दुरुस्ती व परिरक्षण | | | | | |
| पेट्रोल, तेल व वंगण | | | | | |
| इतर खर्च | | | | | |
| घसारा | | | | | |
| एकूण | रुपये | रुपये | रुपये | रुपये | |

311005DSt.